ईमेल cap.exam@mu.ac.in

# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./ 622/२०२४                                                    दिनांक : 23 सप्टेंबर, २०२४

## परिपत्रक :-

विषय:– द्वितीय सत्र २०२४ (हिवाळी सत्र) मध्ये मुंबई विद्यापीठाअंतर्गत घेण्यात येणा–या परीक्षांचे मुल्यमापन OSM (On Screen Marking) प्रणालीतून करण्याबाबत....

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित मानव्य विद्याशाखा, वाणिज्य, आंतरविद्याशाखा आणि विज्ञान विद्याशाखांच्या महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, द्वितीय सत्र २०२४ च्या परीक्षा दि. २४ सप्टेंबर, २०२४ पासून सुरु होणार असून OSM प्रणालीबाबत काही महत्वाच्या सूचना पुढीलप्रमाणे :–

१) द्वितीय सत्र २०२४ परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यमापन हे एकाच कंपनीमार्फत होणार असून त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे :–

अ) URL Link for OSM :- प्राचार्य आणि तांत्रिक समन्वयक यांच्या ईमेलवर पाठविण्यात आली आहे.

ब) महाविद्यालयाचे प्राचार्य आणि तांत्रिक समन्वयक यांचा Login ID व पासवर्ड हा त्यांच्या ईमेलवर पाठविण्यात आला आहे.

क) Help Desk Number for Technical Supports :- 1) 08069459918 2) 9527656051 3) 7447436317 4) 7447455467 5) 74474439565 6) 9527656175 7) 8432941767 8) 9567572127 9) 9119469978 & 10) 8055253067.

ड) Help Desk E-mail ID:- mu.osdeshelpdesk@gmail.com

...२/–

मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

ईमेल cap.exam@mu.ac.in



२) Online and Offline Attendance हा बंधनकारक असून Offline Attendance https://attportal.osdes.in/mu या Link वरून Print Out घेऊन परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. तसेच Online Attendance साठी उपरोक्त दिलेल्या Link मध्ये उपस्थिती नोंदविणे देखील बंधनकारक आहे. तसेच परीक्षा विभागाच्या असेहि निदर्शनास आले आहे की, Attendance fill करताना विद्यार्थी Absent असताना Present दाखविणे किंवा Present असताना Absent दाखविणे अशा चुका महाविद्यालयांकडून वारंवार घडत आहेत.

Link for Online and Offline Attendance https://attportal.osdes.in/mu आहे.

३) Auto Generated QR Code Sticker उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर विद्यार्थ्यांने आसन क्रमांक (Seat No.), विषय कोड (Subject Code) इत्यादीचा उल्लेख करताना केलेल्या चुकांमुळे निकाल घोषित करताना विलंब होतो. विलंब टाळण्यासाठी Attendance Link वरून QR Sticker Download करून विद्यार्थ्यांकडून त्याच्या आसनक्रमांची खातरजमा करून उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर सूचना केलेल्या ठिकाणी चिकटवून विद्यार्थ्यांची Attendance Sheet वर स्वाक्षरी घेण्याची संपूर्ण जबाबदारी Junior Supervisor ची असेल. QR Sticker हे परीक्षा Block मध्येच विद्यार्थ्यांच्या साक्षिने चिकटवावेत. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा चालू होण्यापूर्वी किंवा नंतर चिकटवू नयेत. तसेच QR Code Sticker वर खाडाखोड करू नये. विद्यार्थ्यांने विषय बदलला असेल किंवा QR वर चुकीची माहिती असेल तर असे Sticker न चिकटवता Buffer मध्ये माहिती भरून नविन Sticker Generate करावे व सदर Sticker Answer Book ला चिकटवावे.

४) विद्यापीठ परिपत्रक क्र. १६४८–अ/दि. २७ मार्च २०१८ नुसार प्रत्येक महाविद्यालयाला OSM सेंटर सुरू करणे बंधनकारक आहे.

...३/–

# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

ईमेल cap.exam@mu.ac.in




५) निकाल वेळेत घोषित करण्यासाठी महाविद्यालयांनी कॅप सेंटर रोज सकाळी ७ ते रात्रौ ८ पर्यंत सुरू ठेवावे. तसेच सर्व कॅप सेंटर्स शनिवार, रविवार आणि सुट्टयांच्या दिवशी देखील चालू ठेवावीत.

६) परिपत्रक क्र. ४७७/२०१९/दिनांक २६ फेबुवारी २०१९) नुसार महाविद्यालयांनी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी संख्येच्या १.५ पट उत्तरपुस्तिका तपासणे बंधनकारक आहे. (उदा. १०० विद्यार्थी संख्या, ५ विषय, ५०० उत्तरपुस्तिका १.५ टक्के प्रमाणे ७५० उत्तरपुस्तिका).

७) मुल्यांकन वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने जर एखादा शिक्षक वेळेअभावी किंवा अनुकुल परिस्थितीत त्यांच्या महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर महाविद्यालयात मुल्यांकनासाठी येत असल्यास अशा शिक्षकांना त्यांच्या ओळखपत्राच्या आधारावर मुल्यांकनासाठी संगणक लॅब उपलब्ध करून दयावी.

८). प्राचार्यानी वेळोवेळी आपल्या क्लस्टरमधील लीड कॉलेजच्या प्राचार्यांच्या माध्यमातून विचारलेली माहिती पुरवावी जेणेकरून आवश्यकता भासल्यास वेळीच उपाययोजना करणे सोयीचे होईल.

९) मराठी व इंग्रजी भाषेत लिहिलेल्या उत्तरपुस्तिका वेग वेगळया गठ्ठयात मोहोरबंद करून विद्यापीठात पाठविण्यात याव्यात.

१०). L.D. (दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेच्या आतील पानांवर L.D. चा शिक्का मारावा व Attendance sheet वर सुध्दा L.D. चा उल्लेख करावा.

११). कॉपी केसवावत ज्युनिअर सुपरवायझर व सिनियर सुपरवायझरनी स्पष्ट मत मांडून विद्यापीठात पाठवताना स्वंतत्र पाकिटात पाठविणे. (आणि Attendance sheet वेगळी पाठवावी.) तसेच विद्यार्थ्याकडे भ्रमणध्वनी आढळल्यास पत्रात उल्लेख करावा.

१२). उत्तरपुस्तिकेची ने–आण करण्यासाठी तसेच हाताळण्यासाठी उत्तरपुस्तिकांचे बंडल १०० उत्तरपुस्तिकेंपेक्षा जास्त नसावे.

...४/–

मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

ईमेल cap.exam@mu.ac.in



OSM (On Screen Marking) सुरळीत पार पडण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकांना, प्राचार्य आणि IT Co-ordinator यांना येणा–या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी दिनांक ३० सप्टेंबर, आणि दि. १ व ३ आक्टोबर, २०२४ दुपारी १२.०० वा. Zoom Meeting च्या माध्यमातून कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेची Link महाविद्यालयाचे प्राचार्य आणि तांत्रिक समन्वयक यांच्या ईमेलवर पाठविण्यात येईल.

डॉ. पूजा रौंदाळे
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ